ज्योतिर्मया

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २२३ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०९ कार्तिक शके १९४८, शनिवार दि.३१ ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

पंजाबमधील ड्रग्जचा विळखा: राष्ट्रीय सुरक्षेला धोका

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

पंजाबमधील अमली पदार्थांची (ड्रग्ज) तस्करी आणि वाढते सेवन हा केवळ एक सामाजिक किंवा आरोग्याचा प्रश्न नसून, तो आता राज्याच्या आणि देशाच्या सुरक्षेसाठी एक गंभीर धोका बनला आहे. या समस्येने पंजाबच्या तरुण पिढीला मोठ्या प्रमाणावर विळख्यात घेतले आहे.

पंजाबमध्ये अमली पदार्थांच्या अवैध व्यापार व सेवन हा राज्याच्या सुरक्षेसाठी मोठा धोका बनला असून, अनेक तरुण नशेच्या आहारी जात आहे.

पंजाबमधील हजारो तरुण (ज्यामध्ये शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचाही समावेश आहे) हेरॉईन (चिट्टा), सिंथेटिक ड्रग्ज आणि अंमली गोळ्यांच्या आहारी गेले आहेत. व्यसनामुळे तरुण काम करण्यास असमर्थ ठरत आहेत, ज्यामुळे राज्याचे मानवी भांडवल नष्ट होत असून कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडत आहे.नशेची गरज भागवण्यासाठी पैसे मिळवण्यासाठी तरुण चोरी, जबरी चोरी आणि संघटित गुन्हेगारीकडे वळत आहेत.

अलीकडेच, एका व्यक्तीचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला, त्याच्या कुटुंबीयांना अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे हा मृत्यू झाल्याचा संशय आहे. या घटनेनंतर कुटुंबीयांनी मृतदेह मानसा-सिरसा रस्त्यावर ठेवून केलेले आंदोलन, हे अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे तरुणांच्या होणाऱ्या सततच्या मृत्यूचे एक स्पष्ट उदाहरण आहे. राज्यात अवैध अमली पदार्थांचे जाळे केवळ अधिक खोलवर रुजले आहे असे नाही, तर त्याचा सार्वजनिक जीवन, कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक सुरक्षेवरील परिणामही स्पष्टपणे दिसून येत आहे.

गेल्या काही वर्षांत सीमेपलीकडून अंमली पदार्थ आणि शस्त्रे भारतात पाठवण्यासाठी अत्याधुनिक ड्रोन्सचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.

पंजाबची सीमा पाकिस्तानला लागून आहे. सीमापार राहणारे राष्ट्रविरोधी घटक भारताला, विशेषतः पंजाबला कमकुवत करण्यासाठी ड्रग्जचा शस्त्र म्हणून वापर करत आहेत.

ड्रग्जच्या तस्करीतून मिळणारा पैसा देशविरोधी कारवाया आणि दहशतवादासाठी वापरला जातो, ज्यामुळे अंतर्गत सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे.

गोल्डन क्रेसेंट (इराण, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान) या जगातील सर्वात मोठ्या ड्रग्ज उत्पादक क्षेत्राच्या जवळ पंजाब असल्याने येथे तस्करी सहज होते.

शेती क्षेत्रातील मंदी आणि रोजगाराच्या संधींची कमतरता यामुळे तरुण नैराश्यातून नशेचा मार्ग निवडतात. तस्करांचे स्थानिक पातळीवर असलेले मजबूत जाळे आणि काही अंशी प्रशासकीय भ्रष्टाचार याला खतपाणी घालतो.

पंजाबची ही समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक जनता यांनी एकत्र येऊन झिरो टॉलरन्स धोरण राबवण्याची अत्यंत गरज आहे.ही समस्या केवळ कायदा व सुव्यवस्थेशी जोडलेली नसून, ती पंजाबच्या तरुण पिढीचे भविष्य आणि राष्ट्रीय सुरक्षेशी थेट संबंधित आहे.पंजाबची सीमा पाकिस्तानला लागून असल्याने तिथून होणारी अंमली पदार्थांची तस्करी (ड्रोन आणि इतर माध्यमांतून) रोखण्यासाठी बीएसएफ आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा (अँटी-ड्रोन सिस्टम) वापर वाढवणे आवश्यक आहे.तसेच एनसीबी , एनआयए आणि अंमलबजावणी संचालनालयच्या माध्यमातून ड्रग माफियांचे आंतरराष्ट्रीय आणि आंतरराज्यीय नेटवर्क आणि त्यांचे आर्थिक स्त्रोत (मनी लॉंड्रिंग) उद्ध्वस्त करणे आवश्यक आहे.यासोबामतच अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या स्थानिक तस्करांवर कोणतीही राजकीय सहानुभूती न दाखवता मोक्का किंवा तत्सम कडक कायद्यांतर्गत कारवाई करावी लागणार आहे सुसज्ज पुनर्वासन केंद्र स्थापन करून.तरुणांचे लक्ष अमली पदार्थांकडे जाऊ नये म्हणून त्यांना कौशल्य विकास आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. समाजाला देखील जागृत राहणे आवश्यक आहे.

थोडक्यात सांगायचे तर, जेव्हा केंद्र सरकारचे धोरणात्मक बळ, राज्य सरकारची प्रशासकीय इच्छाशक्ती आणि जनतेचा सक्रिय सहभाग एकत्र येईल, तेव्हाच पंजाबला या ड्रग्सच्या विळख्यातून पूर्णपणे मुक्त करता येईल.




ज्योतिर्मय दीपावली २०२६ : साहित्याचा अखंड दीपोत्सव!

१६४ पानांचा साहित्यखजिना; जाहिरातींना फाटा देत केवळ साहित्याला समर्पित दिवाळी अंक!

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

पुणे (संजय व्यापारी) – दिवाळी आणि दिवाळी अंक यांचे नाते अतूट आहे. मराठी साहित्यविश्वात दिवाळी अंकांची समृद्ध परंपरा जपत, साहित्यप्रेमी वाचकांना दर्जेदार साहित्याची मेजवानी देणाऱ्या 'ज्योतिर्मय दीपावली २०२६' या दिवाळी अंकाचे प्रकाशन रविवार, दिनांक २५ ऑक्टोबर रोजी सातारा येथे थाटात संपन्न झाले.

शालेय विद्यार्थ्यांपासून आजी-आजोबांपर्यंत प्रत्येक वयोगटातील वाचकांसाठी साहित्याची वैविध्यपूर्ण पर्वणी हे या अंकाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. नवोदित साहित्यिकांपासून ते अनुभवी लेखकांपर्यंत अनेक साहित्यिकांचे विविधांगी लेखन या अंकात समाविष्ट करण्यात आले आहे. कथा, कविता, वैचारिक लेख आणि साहित्याचे अन्य प्रकार यांमधून वाचकांना समृद्ध करणारा हा अंक म्हणजे साहित्याचा खऱ्या अर्थाने



आनंदोत्सव आहे.

उत्कृष्ट छपाई, आकर्षक मांडणी आणि तब्बल १६४ पानांचा साहित्यखजिना यांमुळे 'ज्योतिर्मय दीपावली २०२६' हा अंक वाचकांसाठी खास ठरतो. विशेष म्हणजे, या संपूर्ण १६४ पानांमध्ये एकही जाहिरात नाही! व्यावसायिकतेपेक्षा साहित्याला प्राधान्य देणारी ही भूमिका निश्चितच उल्लेखनीय आहे. संपूर्ण अंक केवळ साहित्याने सजवलेला असणे, हे त्याचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

'ज्योतिर्मय' हे केवळ साहित्याला वाहिलेले दैनिक असून, मराठी साहित्याच्या प्रसारासाठी ते सातत्याने कार्यरत आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून २०० हून अधिक साहित्यिक नियमितपणे आपले विचार, भावना आणि सर्जनशील लेखन कविता व विविध साहित्यप्रकारांतून ऑनलाइन स्वरूपात जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचवत आहेत.

नवोदित साहित्यिकांना अभिव्यक्तीची संधी देणे, अनुभवी साहित्यिकांच्या लेखनाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि मराठी वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणे, हे 'ज्योतिर्मय'चे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

आजच्या डिजिटल युगात वाचनाची आवड जपताना मुद्रित साहित्याची समृद्ध परंपराही टिकवून ठेवण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे. साहित्याचा सन्मान, मराठी भाषेचा अभिमान आणि नव्या-जुन्या साहित्यिकांचा स्नेहबंध जपत 'ज्योतिर्मय दीपावली २०२६' हा अंक मराठी साहित्यविश्वात आपले वेगळे स्थान निर्माण करेल, यात शंका नाही.

साहित्याचा दीप असाच तेवत राहो आणि मराठी वाचनसंस्कृती अधिकाधिक समृद्ध होवो, हीच सदिच्छा! हा दिवाळी अंक संपूर्ण महाराष्ट्रभर पोस्टेज खर्चासह रु. ४०० मध्ये घरपोच मागवू शकता. ७७४३९१८५५९ या फोन पे नंबरवर ४०० रु पाठवून याच व्हाट्सअप नंबरवर पैसे पाठवाल्याचा स्क्रिनशॉट व तुमचा संपूर्ण पत्ता पिनकोड सह पाठविणे.

ज्योतिर्मय दीपावली २०२६ : दिवाळी अंकावरील काही बोलक्या प्रतिक्रिया...

ज्योतिर्मय दीपावली २६ प्रकाशन सोहळा.

आज अश्विनी पौर्णिमा. आज मला व नील ला एका छान कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली.

तो कार्यक्रम म्हणजे श्री. शिरीष मामा यांनी आयोजित केलेला ज्योतिर्मय दीपावली २६ प्रकाशन सोहळा.

कार्यक्रम श्री. शिरीष मामा आणि श्री.संजय व्यापारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यांच्या सोबत श्री. नानल, श्री. पुराणिक व प्राचार्य शेजवळ हे मान्यवर व्यासपीठावरती उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. सुरेखा शेजवळ यांनी केलेल्या अतिशय सुस्पष्ट व सुंदर अशा प्रस्तावनेने झाली. सोबत पेटीवादना सोबत सुरेल स्वागत गीत व अतिशय तालबद्ध तबला ऐकायला मिळून कार्यक्रमाचा छान माहोल बनला.

त्या नंतर श्री. शिरीष मामा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी उपस्थित बालचमूला अतिशय सोप्या पद्धतीने दोन परदेशी भाषेतील कथा मराठीत सांगून, वाचन व लिखाण हे किती आवश्यक आहे हे समजावून सांगितले. मुलांनीही खूप आनंदाने सर्व ऐकून त्यांना छान प्रतिसाद दिला.

त्या नंतर श्री. व्यापारी यांनी संपादकाचे मनोगत अतिशय चपखल शब्दात मांडून, उपस्थित सर्वांनाच लिहिते व्हा असा छान संदेश दिला. तसेच त्यांनी अनेक लहान मुलांचा सहभाग पाहून पुढील वर्षी पासून बाल दिवाळी अंक काढण्याची घोषणा केली.

या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यात खूप छोटे, शालेय नवोदित लेखक व लेखिका सहभागी झाले होते. त्यांचे लिखाण व कविता त्यांनी असेच पुढे सुरू ठेवावे म्हणून कार्यक्रमात त्यांना प्रत्येकाला एक छोटी आठवण भेट देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

या दिवाळी अंकामधील लेखिका या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. त्यांनाही आठवण भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या सर्व नवोदित लेखिकांनी सातारा शहरात आलेल्या श्री. व्यापारी यांना आठवणीत राहील अशी खास भेट म्हणून श्री समर्थ रामदास स्वामी यांचे दासबोध दिले. ते देण्याचा मान या पुस्तकातील सर्वात वयोवृद्ध अशा लेखिका, वय वर्षे ८०, यांना देण्यात आला.

सगळ्यात शेवटी उपस्थित सर्वांचे भरपूर फोटो काढून या कार्यक्रमाची सांगता झाली. नवोदित लेखक व कवी यांचे साठी असा आवर्जून केला जाणारा अशा आगळ्या वेगळ्या कार्यक्रमचा खऱ्या अर्थाने सोहळा झाला.



– अंजली नील चिटणीस –पुणे
बँक ऑफ बडोदा
(मो)९८२३२०३०६०

संपादकच जेंव्हा घरी येतो....

आदरणीय संजय व्यापारी सर,

सस्नेह नमस्कार!

काल आपण स्वतः आवर्जून माझ्या घरी येऊन ज्योतिर्मय दिवाळी अंक आपल्या हस्ते मला भेट दिलात, त्याबद्दल मी आपला शतशः ऋणी आहे.

एखादा संपादक आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून स्वतः लेखकाच्या घरी येतो, त्याला आपल्या अंकाची प्रत प्रेमाने सुपूर्द करतो आणि त्याने लिहिलेल्या लेखाचे मनापासून कौतुकही करतो, ही गोष्ट मनात कृतज्ञतेची एक सुंदर भावना जागवून जाते. आपल्या या कृतीतून मला केवळ एका संपादकाचे मोठेपण जाणवले नाही, तर एका संवेदनशील साहित्यप्रेमी माणसाचे मनही अनुभवता आले.

लेख लिहिताना आपण जे काही शब्दांतून मांडतो, ते वाचकांपर्यंत पोहोचावे, त्यांना भावावे आणि त्यातून एखादा संवाद निर्माण व्हावा, एवढीच लेखकाची माफक अपेक्षा असते. पण जेव्हा त्या लेखाची दखल आपल्यासारखा जाणकार संपादक घेतो आणि त्याविषयी भरभरून कौतुक करतो, तेव्हा लेखनासाठी घेतलेले कष्ट सार्थकी लागल्याची भावना मनात निर्माण होते. आपल्या कौतुकाच्या शब्दांनी माझा आनंद द्विगुणित झाला आणि पुढेही अधिक मनापासून लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

दिवाळी अंक प्रकाशित करणे ही एक गोष्ट; पण त्या अंकासाठी मनापासून लेखन करणाऱ्या लेखकांच्या घरी जाऊन त्यांच्या साहित्याचा सन्मान करणे, त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवणे आणि त्यांच्याशी आपुलकीचे नाते जोडणे, हीच खऱ्या अर्थाने साहित्यसंस्कृती समृद्ध करणारी परंपरा म्हणावी लागेल. सर, आपल्या या साहित्यनिष्ठेचा आणि लेखकांप्रती असलेल्या जिव्हाळ्याचा मनापासून अभिमान वाटतो! आपण केवळ दिवाळी अंक वाचकांपर्यंत पोहोचवत नाही, तर लेखकांच्या मनापर्यंतही पोहोचत आहात. लेखकाच्या लेखणीचा सन्मान करणारी आणि त्याच्या भावविश्वाशी नाते जोडणारी आपली ही भूमिका निश्चितच प्रेरणादायी आहे. बाकी आपला दिवाळी अंक हा अतिशय उत्कृष्ट झाला आहे. अंकाची मांडणी, त्यातील साहित्याची समृद्धता, आशयातील विविधता आणि एकूणच दर्जा मनाला भावून गेला. आपल्या या सुंदर उपक्रमाला, साहित्यसेवेला आणि संवेदनशील दृष्टिकोनाला मनःपूर्वक सलाम! आपल्या हातून अशीच दर्जेदार साहित्यनिर्मिती घडत राहो, लेखक-वाचकांचे नाते अधिक दृढ होत राहो आणि आपल्या कार्याला सदैव भरभरून प्रेम व यश लाभो, ही मनापासून सदिच्छा.

पुन्हा एकदा दिवाळी अंकासाठी, आमच्या साहित्याला दिलेल्या स्थानासाठी आणि एका नवोदित लेखकाचा इतक्या आत्मीयतेने सन्मान केल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद, सर!



आपला
स्नेहांकित,
– मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
मो नं – ९८९०६१९३५४

ज्योतिर्मय दिवाळी फराळ अविस्मरणीय...

खूप छान दिवाळी अंक आहे सर यंदाचा. त्यात अगदी बालसाहित्यापासुन ते रेसिपीज, सामाजिक, कौटुंबिक सारेच विश्व सामावले आहे. खरोखर दर्जेदार, वाचनीय आणि संग्रही ठेवावा असा अंक आहे.

त्यापेक्षाही हा अंक आपण आपल्या बिझी व्यापातून वेळ काढुन स्वतः घरी येऊन, प्रत्यक्ष भेटून हातात दिला याचा जास्त आनंद वाटला.



मनःपूर्वक धन्यवाद आणि खूप साऱ्या शुभेच्छा.

फक्त एकच, मिस्टर नेमके घरी नसल्यामुळे भेट झाली नाही तुमची आणि फोटो काढायचा राहून गेला. असो. दिवाळीत फराळाला याल तेंव्हा भेट होईलच

– सौ. स्नेहा मुश्रीफ,
पुणे.

"क्षण स्नेहाचा, आदरणीय भेटीचा...!"

आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा ठरला. ज्योतिर्मय चे संपादक आदरणीय संजय सर यांनी त्यांच्या अत्यंत व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून, आज आमच्या पिंपळे सौदागर येथील निवासस्थानी स्वतः येऊन सदिच्छा भेट दिली आणि ज्योतिर्मयचा दीपावली विशेषांक सुपूर्द केला.


सरांचे कामातील व्यस्तत्व आपल्या सर्वांनाच माहीत आहे, तरीही त्यांनी वेळात वेळ काढून दिलेली ही भेट आणि दाखवलेला जिव्हाळा मनाला खूप भावून गेला. त्यांच्याशी झालेली सुखद चर्चा आणि हा स्नेहबंध खरंच खूप सुखावणारा होता.

आदरणीय संजय सर, आपल्या या मौल्यवान भेटीबद्दल आणि विशेषांकाच्या या सुंदर भेटीबद्दल आपले मनःपूर्वक आणि सस्नेह आभार !



– सौ. भामिनी महाले
पिंपळे सौदागर, पुणे.

मा.संजय सर नमस्कार. आपण ज्योतिर्मय चा उत्कृष्ट दिवाळी अंक प्रकाशित केल्या बद्दल सर्व प्रथम मी आपले अभिनंदन करतो. आपण स्वतः आमच्या घरी येऊन हा दिवाळी अंक आम्हास भेट दिला त्यामुळे आम्हाला मनस्वी आनंद तर झालाच,परंतु एक प्रकारे उर्जा मिळाली. त्या उर्जेमुळे आता आमची लेखणी थांबणार नाही. खरं तर ही आपली पहिलीच प्रत्यक्ष भेट झाली. आपल्याशी भेटीत संवाद झाला, चर्चा झाली.खरं तर संपादक म्हटलं की कामाचा व्याप खुपच असतो व त्यात जवाबदारी ही असतेच.परंतु त्यातही आपण वेळ काढून एखाद्या लेखकाच्या घरी जाऊन स्वतः अंक देणे म्हणजे हा एक नविनच उपक्रम मनाला फार भावून गेला. ही बाब केवळ कौतुकास्पद नाही तर अभिमानास्पद आहे. आपण गेल्या अनेक वर्षापासून या कार्यक्षेत्रात काम करीत आहात. उत्तरोत्तर आपल्या हातून असेच कार्य घडत राहो ही सदिच्छा. अर्थात आपले कार्य आधिक गतीने होईल यात शंकाच नाही. आपणास पुढील कार्यासाठी शुभेच्छा.



धन्यवाद सर.

– प्रमोद दसरे,
हडपसर पुणे



जात्यावरच्या ओव्या.....

नाही पडलास पाण्या
दगा केला बरोबर
घेतल्या होत्या पैजा
यंदा तुह्या जीवावर ॥९१५॥

नाही पडलास पाण्या
मला पाडल तोंडावर
करणार होतो यंदा
राणीला मणी गळाभर ॥९१६॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८४





ज्योतिर्मय साहित्य

जा राम विश्राम योगेश्वरांचा ।
जपू नेमिला नेम गौरीहराचा ।
स्वये नीववी तापसी चंद्रमौळी ।
तुम्हा सोडवी राम हा अंतकाळी ॥८५॥

अर्थ : योगेश्वरांचे विश्रांतीस्थान असलेले रामनाम जपा. प्रत्यक्ष गौरीहर म्हणजे शंकर देखील नित्यनेमाने आपला ठरलेला रामनामाचा जप पूर्ण करतात. या नामजपाने भगवान शंकरांना देखील शांती मिळते. असा हा श्रीराम अंतकाळी आपली सुटका करील.


(विश्राम - विश्रांतीचे स्थान, गौरीहर - शंकर आणि पार्वती, तापसी - तपस्वी)


विवेचन : रामनामाचे महत्व सांगताना समर्थ म्हणतात की रामनाम हे योग्यांचा विश्राम म्हणजे विश्रांती आहे. इथे समर्थांनी त्यासाठी योगेश्वर शब्द वापरला आहे. या शब्दाचे तीन अर्थ घेता येतात. पहिला अर्थ जो समर्थांना अपेक्षित आहे तो म्हणजे योगेश्वर भगवान शंकर. आपण श्रीकृष्णाला देखील योगेश्वर म्हणतो. पांडुरंगशास्त्री आठवले तर आपल्या स्वाध्यायात श्रीकृष्णाला योगेश्वर भगवानच म्हणतात. हा दुसरा अर्थ. आणि तिसरा अर्थ म्हणजे जे योगी साधक आहेत, तप करणारे आहेत ते. तेव्हा यातील कोणत्याही अर्थाने योगेश्वर शब्द घेतला तरी सर्व श्रेष्ठ पुरुष शेवटी रामनामाचाच आश्रय घेतात. रामनाम हे त्यांचे विश्रांतीस्थान आहे हेच यातून स्पष्ट होते.

श्रीकृष्ण देखील रामनामाचा जप करत असत असा पुराणात उल्लेख आहे. कलियुगात रामनाम हेच तारक आहे असे त्यांनी युधिष्ठिराला सांगितले होते. श्रीकृष्ण आणि श्रीराम दोघेही विष्णूचेच अवतार. त्यांच्यामध्ये भेद नाही. पण कलियुगात भक्तीचा सोपा मार्ग म्हणून श्रीकृष्णांनी रामनाम घेण्याचा उपदेश केला आहे. राम, कृष्ण आणि शंकर यांच्यातही भेद नाही. जसे भगवान शंकर रामनामाचा जप करीत असतात तसेच श्रीराम देखील भगवान शंकराचे पूजन करीत असतात. शंकराचार्यांनी याच अद्वैत सिद्धांताचे प्रतिपादन केले होते. परमेश्वर एकच आहे. आपण त्याचे जे कोणते नाम घेऊ, त्यावर आपली दृढ श्रद्धा हवी.

(क्रमशः)







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचा अनुभव

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

***



आपले सण, आपले उत्सव

दिवाळी

घन त्रयोदशी

जे वाक्य आपण कधीच चूक ठरणार नाही, किंवा त्यात कोणताही बदल होणार नाही, त्या वाक्याला आपण ब्रह्म वाक्य म्हणतो. ब्रह्म देवानेच आपल्या मुखातून या उत्सवा साठीचे एक वचन दिले आहे ते असे

आश्विनस्यासिते पक्षे त्रयोदश्यां निशामुखे/
यमदीपं बलीं दद्यादपमृत्युविनश्यती/

अश्विन महिन्याच्या कृष्ण पक्षातील त्रयोदशीला, रात्रीच्या सुरुवातीला जो प्रतिवर्षी घराच्या दाराशी उज्वल दीप ठेवतो व खालील मंत्र म्हणतो.

मंत्रेणानेन भो दूता:समानेय:स नोत्सवे/
प्राप्तेपमृतावापि च शासनं क्रियतां मम

तेव्हा यम आपल्या दुतांना आज्ञा करतो की जे या मंत्राने दीप लावतील त्यांना माझ्या इथे आणू नये. अप मृत्यू आला तरीही माझी आज्ञा पाळावी.

■ अपमृत्यू

कमी वयात आलेला मृत्यू, अपघाताने आलेला मृत्यू किंवा आत्महत्येने आलेला मृत्यू याला अपमृत्यू म्हणतात. म्हणूनच परमेश्वराला मागणी करताना जीवेत वर्ष शतम साग्रम अपमृत्यू विवर्जीत:

आपले जीवन हे भरपूर 100 वर्षेपर्यंत असावे. ते समृद्धीने युक्त असावे व असा अपमृत्यू येऊ नये हीच मागणी सर्वांची असते. आजच्या काळात नैराश्याने, ताण तणावाने,आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. या दिव्यांना केलेल्या प्रार्थने मुळे असे अपमृत्यू टळतील. मन प्रसन्न व सकारात्मक राहील,अपघाताने ही मृत्यू होणार नाहीत. अशी ग्वाही साक्षात ब्रह्मदेवाने दिली आहे.

मृत्यू, पाश आणि दंड तसेच काळ आणि माझ्यासह त्रयोदशीला दीप दानाने(म्हणजे उंबरठ्या जवळ दीप लावणे) सुर्यज यम प्रसन्न होतो.असे यमराज सांगतात.



अनुभव शिकण्यासाठी व चुका सुधारण्यासाठी

मित्रांनो आणि वाचकहो आज मी तुम्हाला एक नविन विचार सांगभार आहे बघा.. पटतं का.. निसर्ग काय किंवा मानवी जीवन काय.. सतत बदलणार आहे. बदलत आलं आहे. ऋतुचक्रही बदलतं का राहते? झाडालाही पालवी फुटून परत पानगळ होते.परत पालवी फूल.फल. तर सर्वत्र हाच नियम आहे म्हणून मला एक सांगा थांबून चालेल का? थांबला तो संपला. बरे म्हणून चालेल का? जुनं ते सोनं. किंवा जे चाललं ते चालूद्या. तर बदलाबरोबर आपणास चाललं पाहिजे. टिव्ही मोबाईल पुर्वी होते का? फ्रीज मशीन होते का? पण आज आपण वापरतो ना. बदल स्वीकारणे म्हणजे भूतकाळ विसरणे नाही. वा आपल्या तत्वाचा त्याग करणेही नाही. परिस्थितीचा मुकाबला करून, धडा समजून घेऊन, आवश्यक तेथे सुधारणा करून पुढे जाणे शहाणपणाचे आहे! काही बदल आनंदी तर काही कटू असू शकतात. पण यावरच आपला पुढील प्रवास जीवन विकास, वाढ आणि वारसा अवलंबून आहे. कालपरवा पर्यंत ओळखीचे असलेले दृश्यही काळाच्या ओघात बदलून जातेच. तसेच आसपासचा परिसर, माणसे, जबाबदारी व कधी आपणही बदलून जातोच! म्हणून जुन्या सवयी घट्ट धरून बसू नये.. असे मला वाटते. परिस्थितीने दिलेला नविन धडा समजून सामोरे जावे. का तर आपल्यावेली जे योग्य होते ते आजही योग्य असेल असे मुळीच नाही. म्हणून नव्याचे स्वागत करणेही कधी योग्य ठरते. आज एवढे पुरे करतो व थांबतो. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे.आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना. आवडले तर लाईक कंमेट करा.सुप्रभात.



घराघरातील वाढता तणाव : वयात येणारी मुलं आणि चिडचिडी आई!

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

- आईची चिडचिड म्हणजे तिचे मुलांवर प्रेम नाही असे नव्हे; अनेकदा ती स्वतःच्या थकव्याशी आणि ताणाशी झुंज देत असते.

- आईलाही प्रेम, विश्रांती, भावनिक आधार आणि समजून घेणाऱ्या माणसाची गरज असते.

३. आई आणि मुलांमध्ये दुरावा का निर्माण होतो?

- जेव्हा मुलं स्वतःचे मत मांडतात, तेव्हा आईला वाटू शकते की मुलं तिचा आदर करत नाहीत. दुसरीकडे, आई वारंवार सूचना देत असेल किंवा रागावत असेल, तर मुलांना वाटू शकते की आपल्याला कोणी समजून घेत नाही.

- अशा वेळी दोघेही आपापल्या जागी बरोबर असल्याचे समजतात; पण एकमेकांच्या भावना ऐकून घेण्यास विसरतात.

- आई म्हणते, ''माझं ऐकतच नाहीस!''

- मुलं म्हणतात, ''तुम्ही मला कधी समजूनच घेत नाही!''

आणि अशा छोट्या वाक्यांमधून मोठा भावनिक दुरावा निर्माण होऊ शकतो.

यावर उपाय म्हणजे कोण बरोबर आणि कोण चूक हे ठरवणे नव्हे, तर एकमेकांचे म्हणणे शांतपणे ऐकणे.

४. नात्यातील गोडवा टिकवण्यासाठी काय करावे?

१. रागाच्या क्षणी शांत राहा. रागात बोललेले शब्द मनाला खोलवर लागतात. वाद वाढत असेल तर थोडा वेळ शांत राहून नंतर चर्चा करा.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

२. मुलांना बोलू द्या. त्यांच्या भावना, अडचणी आणि मतांना महत्त्व द्या. प्रत्येक वेळी उपदेश करण्याऐवजी त्यांचे म्हणणे समजून घ्या.

३. तुलना करणे टाळा. ''अमुक मुलगा किती चांगला आहे!'' किंवा ''आमच्या वेळी असं नव्हतं!'' अशी वाक्ये मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण करू शकतात.

४. प्रेमासोबत शिस्तही ठेवा. मुलांना स्वातंत्र्य द्या; पण आदराने बोलणे, जबाबदाऱ्या पार पाडणे आणि सुरक्षित मर्यादांचे पालन करणे यांचे महत्त्वही समजावून सांगा.

५. दररोज थोडा वेळ एकमेकांसाठी ठेवा. दिवसभरात किमान १०१५ मिनिटे मोबाईल बाजूला ठेवून एकमेकांशी मनमोकळा संवाद साधा.

६. आईने स्वतःची काळजी घ्यावी. पुरेशी झोप, संतुलित आहार, चालणे, योगाभ्यास आणि स्वतःसाठी थोडा वेळ यामुळे ताण हाताळण्यास मदत होऊ शकते.

५. आयुर्वेद आणि मानसिक आरोग्य*

- आयुर्वेदात संतुलित आहार, नियमित दिनचर्या, पुरेशी झोप आणि मनः शांती यांना महत्त्व दिले आहे.

- नियमित वेळी झोपणे आणि उठणे, पौष्टिक आहार घेणे, हलका व्यायाम करणे, श्वसनाचे व्यायाम करणे आणि शांत वातावरणात वेळ घालवणे या सवयी आई आणि मुलांसाठी उपयुक्त ठरू शकतात.

- शरीर आणि मन यांचे आरोग्य परस्परांशी संबंधित आहे. मात्र, सततची चिडचिड किंवा मनःस्थितीतील मोठे बदल हे केवळ हार्मोन्स किंवा वात-पित्त-कफ यांच्या असंतुलनामुळे होतात असे समजणे योग्य नाही. गरज पडल्यास डॉक्टर किंवा मानसिक आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

(क्रमशः)



वेळेचे महत्व

वेळेचे महत्व जाणूनी
सुयोग्य नियोजन करुन
जीवनी यश मिळवावे
कष्ट,मेहनत,जीद्द
वापरुन ही त्रिसुत्री
प्रगतीपथावर पुढे चलावे

कंटाळा,आळस हे
शत्रू आहेत यशाचे
स्वतःच जाणूनी घ्यावे
भविष्याचा विचार करुन
सुयोग्य विचारासवे खरे
मेहनतीने यश मिळवावे

भारतीय अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष -डॉ.होमी भाभा


ज्योतिर्मय साहित्य

(३० ऑक्टोबर जयंती विशेष)

डॉ होमी भाभा हे भारतातील थोर शास्त्रज्ञ होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.आणि या भारताचे पहिले प्रधानमंत्री म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांची निवड करण्यात आली.त्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवून आपल्या राष्ट्रांची प्रगती साधायची होती. त्यांच्या विचार विनिमयातून १० ऑगस्ट १९४८ रोजी अणुऊर्जा आयोगाची स्थापना करण्यात आली.आणि अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. होमी जहांगीर भाभा यांची निवड एकमताने करण्यात आली.त्यामुळे त्यांनी आपल्या संशोधन कार्यातून अनेक महत्त्व पूर्ण शोध लावले. त्यामुळे जगात भारताचे नाव संशोधन कार्यात पुढे आले.त्यासाठी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा किताब प्रदान केला.

त्यांच्या या कार्याची दखल शासनाने घेतली.अशा या वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या शास्त्रज्ञांची माहिती आपणाला व्हावी. त्यांच्या पासून प्रेरणा घेऊन आपण अनेक जणांनी संशोधन करावे. यासाठी हा लेखन प्रपंच...

डॉ.होमी भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९९० रोजी पारशी कुटुंबात झाला. त्यांचे घराणे हे अगोदर पासूनच सधन घराणे म्हणून ओळखले जात होते. बालपणापासूनच त्यांना वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके वाचण्याची आवड होती. त्यामुळे घरात त्यांच्या पुस्तकांचा ढीग पडलेला असे. जास्तीत जास्त विज्ञानाची पुस्तकं त्यांना आवडत होती.आजपर्यत वैज्ञानिक शोध कोणी कोणी लावले? कसे लावले? केव्हा लावले? या प्रश्नाची उकल त्यांनी केली. त्याबरोबरच कविता करण्याचा छंद ही त्यांना होता.



चित्रकलेमध्ये ते अग्रेसर होते. एकच व्यक्ती अनेक क्षेत्रात जेव्हा कार्य करतो. तेव्हा तो सन्माननीय मनुष्य होतो. इतरांचा प्रेरणास्थान म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

असे हे अभ्यासू व्यक्तिमत्व त्यांची आज जयंती त्या निमित्ताने त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या कार्यकर्तृत्वाचा आढावा आपण या ठिकाणी करून घेत आहोत. त्यांचे प्राथमिक ते पदवी पर्यंतचे शिक्षण मुंबई या ठिकाणी झाले. गणित विषय शिकवण्यासाठी त्यांचे गुरु पॉल डेरॅक होते. अणुचा वापर शांततेच्या मार्गानेच व्हावा.

असे स्पष्ट मत संयुक्त राष्ट्राच्या सभेत मांडणारे ते पहिले भारतीय वैज्ञानिक होते. अणुऊर्जेपासून वीज निर्मिती करता येते. हे त्यांनी आपल्या संशोधन कार्यातून दाखवून दिले. अन्नधान्य उत्पादन जास्तीत जास्त करणे. व ते अनेक दिवस टिकवणे यासाठी प्रगत तंत्रज्ञान उभारण्याचं काम त्यांनी केले. नॅनो टेक्नॉलॉजी विकसित करणे. अशी अणुऊर्जा आयोगाची महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी संशोधना तून निर्माण केल्यामुळे त्यांना अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. १९३६ मध्ये डॉक्टरेट पदवी त्यांनी मिळवली. त्यामुळे त्यांना अनेक शिष्यवृत्ती व बक्षिसे देण्यात आले त्यांचे कार्यक्षेत्र भौतिकशास्त्र होते. त्यांची कार्य संस्था कॅव्हेंडिश लॅबोरेटरी टाटा मूलभूत संशोधन संस्था, भारतीय अणुऊर्जा आयोग.

त्यांचे सर्व प्रशिक्षण केंब्रिज विद्यापीठात झाले म्हणून त्यांची ख्याती जगभर पसरली.१९४० मध्ये बंगाल येथे प्रोफेसर म्हणूनही त्यांनी अध्यापनाचे कार्य केले १९४५ मध्ये टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे स्थापना करण्यात आली. १९४८ला अणुऊर्जा आयोगाचे स्थापना झाली.

१९५६ मध्ये अणुऊर्जा विभागाने अणुऊर्जेवर चालणारी भारताची पहिली अणुभट्टी अप्सरा ही कार्यान्वित केली. मुंबई जवळ तारापूर येथे अनुशक्ती केंद्राची १९६९मध्ये स्थापना करण्यात आली.आणि त्यामध्ये अणुऊर्जे पासून विद्युत निर्मिती करता येते.



प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपतराव
अध्यक्ष:विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता.मुखेड जि.नांदेड

हे सिद्ध करण्यात आले. तामिळनाडू राज्यात कल्पकम येथे रिॲक्टर रिसर्च सेंटर सुरू करून थोरियमच्या विद्युत निर्मिती साठी उपयोग कसा केला जातो. हे सिद्ध करून दाखवले. अणुशक्तीच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या जड पाण्याचे कारखाने अनेक ठिकाणी उभे करण्यात आले.

त्यात वडोदरा, तालचेर ,तुतीकोरीन,कोठा या ठिकाणी उभारले. अनुभट्ट्यासाठी जड पाण्याचे (हेवी वॉटर) देशांतर्गत मोठ्या प्रमाणावर उत्पादन व संशोधन करण्यासाठी हेवी वॉटर प्रोजेक्ट्स या संस्थेची स्थापना करण्यात आली. त्यामुळे अणुऊर्जा आयोगाने अतिशय महत्त्वाचे संशोधन केले.

या सर्व कार्याची दखल घेऊन अनेक शासकीय संस्थांनी त्यांना पुरस्कार प्रदान केले.१९४१ मध्ये वयाच्या ३१ व्या वर्षी रॉयल सोसायटीचे फेलो, सदस्य म्हणून घेण्यात आले.१९४२ ला भौतिक कणाच्या सिद्धांता वरील कार्यासाठी ॲडम्स पुरस्कार आणि.१९४८ मध्ये केंब्रिज फिलॉसॉफिकल सोसायटीतर्फे हॉपकिन्स पुरस्कार मिळाले.

आपले जीवन सरळ मार्गाने चालणे.व्यसनापासून दूर राहणे.मोठ्याचा आदर करणे.महिलांचा सन्मान करणे

चित्रकलेत ते पारंगत होते.

गुरू बदल अपार प्रेम होते.एवढे मोठे व्यक्तीमत्व असूनही आकाशाला हात लागले तरी कधीही जमिनीवरील पाय उचलले नाहीत.म्हणून तर ते संशोधक झाले.भारत सरकारने त्यांच्या सर्व कार्याची दखल घेतली. त्यांना पद्मभूषण किताब प्रदान केले. अशा या अणुसंशोधक शास्त्रज्ञाचा मृत्यू वयाच्या ५६ व्या वर्षी म्हणजेच दि.२४ जानेवारी १९६६ रोजी विमान अपघातात झाला.

त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना पवित्र पावन स्मृतीस विठू माऊली प्रतिष्ठान कडून विनम्र अभिवादन..

जीवन आनंद मार्ग.....

ज्योतिर्मय साहित्य

ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात येत नाहीत त्या बद्दल आपल्या मनात खेद करीत बसण्यापेक्षा त्या विस्मरणात ठेवणे हा एक पर्यायी आनंद मार्ग आहे. जीवन सुखाची अनुभूती त्या पासून मिळतेच. पणत्या साठी नकारात्मक विचारांचा त्याग करणे महत्वाचे आहे.

जीवनातील आनंद समाधानाचे क्षण उपभोगण्याचा आणखी एक सहज सोपा मार्ग आहे. तो म्हणजे, जेव्हा तुम्ही दुसऱ्याला आनंद देण्यासाठी जीवाचे रान करता, प्रयत्नांची पराकाष्ठा करता , तेव्हा तुम्ही खरा आनंद कळत नकळत अनुभवत असता. जेव्हा तुम्ही दुसऱ्याच्या मनाला, विचाराला, इच्छेला , स्वप्नाला पूर्ण करण्याचा ध्यास घेता तेव्हा आपलेही सुख स्वप्न , मनोरथ, पूर्ण करण्याचा आपल्या मनातील संकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर जात असतो. इतरांच्या गरजा पूर्ण करण्याचा आपल्या मनातील असलेला छंद , कल असेल तर आपल्या ही गरजा पूर्ण झाल्याचे अनुभवास येईल. कारण परोपकार पुण्य वह असतो मनाला समाधानाच्या थारोळ्या तून खळखळून वाहण्याचा एक प्रकारचा आनंदच देत असतो . अर्थात आपण पेरू तेच उगवणारे असते. एखाद्याच्या जीवनात आनंद क्षण पेराल तर कित्तेक पटीने आपल्या जीवनात आनंद वर्षाव झाल्या शिवाय राहणार नाही. कारण आनंद पेराल तर दुःख कसे उगवेल. आंब्याच्या झाडाला आंबे च लागणार ना? हा निसर्ग नियम मानसाला देखिल लागु होणारच. म्हणून आधी दुसऱ्याच्या आनंदाचा विचार करावा तेव्हा हा स्वानंद मिळविण्या सारखेच होईल. पण त्या साठी प्रयत्न करणे मात्र अहं सोडून करणेची गरज असते.

जेव्हां एखाद्या कार्यात आपण मनाने गुंतुन जातो मनात त्याचाच ध्यास मात्र असावा लागतो .अपयश येईल असे मनात न आणले पाहिजे. त्यासाठी सातत्याने संयम ठेवून संघर्ष करण्याची ढाल वापरली पाहिजे. थोडक्यात भयमुक्त व्हाल तर यशाने आपले मस्तक उंच झाल्या शिवाय राहणार नाही. जे आकाश आपण गाठू शकत नाही किंवा एखाद्या गोष्टीत यश मिळविणे खरच आपल्या क्षमते बाहेर असेल तर त्याच्या नादी लागणे सोडले पाहिजे. नसता हैव ही जाईल अन् दैवाने आधीच पाठ दाखवलेली असते. आपण काय करण्याने आपल्याला आनंद होवू शकतो हे अनुभवातून ठरविले पाहिजे. विचारांती संकल्प दृढ करावा लागतो तरच आपण त्याच्या पुर्तते नंतर आनंद उर्जा मिळवू शकतो. ज्या संकल्प पूर्ती पासून आपल्या आनंदात भर पडत नाही तो संकल्प करणे आणि त्याचा पाठपुरावा करणे केव्हा ही दुःख दायक असते . चांगले संकल्प करण्यासाठी कोठलाही मुहूर्त पाहण्याची गरज नाही. त्यासाठी जिद्द आणि आपल्या नीर्धारा मध्ये सातत्य असावे लागते पण मनात भिती नसली पाहिजे , तर आनंद मिळवण्यात कोठेच कमतरता भासत नाही. आपल्याला आनंदी जीवन जगायचे असल्यास इतरांशी तुलना करण्यासाठी तराजू हाती घेतली न पाहिजे . त्याच प्रमाणे कोणी निंदा केल्याने आपले ध्येय किंवा कार्य कलंकित होत नसते , पण सुसंगती किंवा समविचारी लोकांची साथ मिळाली तर ही आनंद वेल गगनाला भिडल्या शिवाय राहणार नाही.



आपणच आपले मीत्र व्हावे
धैर्याने संकटाना निस्तरावे
चिंतन करून निर्णय घ्यावे
कठोर परिश्रम करीत रहावे
दुःख आनंदानी सहन करावे
पिडीतांना सहाय्य करावे
मनात माणुसकीस जपावे
मनाने सदा श्रीमंतच असावे
ह्यातच आत्मकल्याण जाणावे
आले ते क्षण आनंदे स्वीकारावे
मनी सदा संतुष्ट आनंदे असावे
हेच आनंद पर्व मानीत जावे .
इतकेच !

माजी शिक्षण मंत्र्यांनी वैजापूर जि.प.प्रशालेला स्वखर्चाने बांधून दिले प्रसाधन गृह

ज्योतिर्मय साहित्य

वैजापूर – राज्याचे माजी शिक्षणमंत्री व जि.प.प्रशाला मुलांची चे माजी विद्यार्थी डॉ.कमल किशोर कदम यांनी आपल्या स्वखर्चाने या प्रशालेला तीन प्रसाधन गृह बांधून दिले, या प्रसाधनांचे उदघाटन शालेय समिती अध्यक्ष रवींद्र आप्पा साखरे व सौ. शशी अग्रवाल यांच्या हस्ते शुक्रवार (ता.३०) रोजी करण्यात आले.या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांना पोशाख ही वाटप करण्यात आले.छत्रपती संभाजीनगर येथील जे.जे.प्लस रुग्णालयाचे प्रमुख व या प्रशालेचे माजी विद्यार्थी डॉ.जीवन राजपूत यांनी प्रशालेला सी.सी.टी. व्ही.दिले

त्याचेही विमोचन झाले.या प्रसंगी सेवा. निवृत्त, शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा, साहेबराव साळुंके, उपाध्यक्ष अशोक धसे, सदस्य मुकुंद दाभाडे, श्री. त्रिभुवन यांची उपस्थिती होती. शशी




अग्रवाल व धोंडीरामसिंह राजपूत यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता राखण्याचे, पाणी काटकसरीने वापरण्याचे, नियमित शाळेत येऊन उच्च शिक्षण घेण्याचे, आदर्श नागरिक बनून देश सेवा करण्याचे आवाहन केले. या शाळेचे विद्यार्थी अशोक संचेती कॅनडा देशात आहेत तेही दरवर्षी या शाळेच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम पाठवितात. डॉ.कमल किशोर कदम यांचे वडील येथील पंचायत समितीत विस्तार अधिकारी होते, तेंव्हा ते या शाळेत शिकलेले आहेत. मध्यंतरी त्यांनी या शाळेला भेट दिली होती, विद्यार्थ्यांची गैरसोय त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी प्रसाधन व्यवस्था स्वखर्चाने करून दिली.या शाळेचे मुख्याध्यापक सुनील पगार यांनी प्रास्ताविक केले, तर सूत्र संचलन शिक्षक के.ए. वाघ यांनी केले. निर्मला भोये, अनिता शिंदे, मच्छिद्र शिंदे यांनी सहभाग नोंदविला.











स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनची कोजागिरी पौर्णिमा उत्साहात संपन्न



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने गीता भवन येथे दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि स्नेहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला सभासदांची लक्षणीय उपस्थिती लाभली. तसेच, चीफ मॅनेजर (एचआर) श्रीमती अर्चना पै आणि श्रीमती सोनाली कटारे यांनी आवर्जून उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाची सुरुवात अलीकडच्या काळात निधन पावलेल्या व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात वाढदिवस असलेल्या सभासदांचा सत्कार करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

संघटनेच्या वतीने १ एप्रिल २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये श्री. नागेश जोशी, श्री. निळकंठ जीवने, श्री. सुभाष पवार, श्री. यशवंत अहिरे आणि श्री. पंढरीनाथ दिघुळे यांचा समावेश होता. या उपक्रमातून ज्येष्ठ सभासदांप्रती असलेला आदर, स्नेह आणि आपुलकीची भावना व्यक्त करण्यात आली.

सत्काराला उत्तर देताना ज्येष्ठ सभासदांनी आपले मनोगत व्यक्त केले. संघटनेने केलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी आभार मानले. अशा उपक्रमांमुळे सभासदांमधील परस्पर स्नेह, आपुलकी आणि एकोपा अधिक दृढ होतो, असे त्यांनी नमूद केले.

यानंतर श्री. पद्मानंद पहुरकर यांना संघटनेच्या कार्यकारिणीत सामावून घेण्यात आले.

यावेळी स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन, महाराष्ट्र सर्कलचे अध्यक्ष श्री. विश्वास पटवर्धन यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी छोटेखानी भाषणातून संघटनेच्या कार्याचे कौतुक केले.

संघटनेचे सचिव श्री. महेश गोसावी यांनी मेंबरशिप ड्राइव्हचा उल्लेख करून जनरल सेक्रेटरी यांनी केलेल्या आवाहनानुसार नवीन सभासदांची संख्या वाढविण्यासाठी सर्वांनी सक्रिय प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. त्याचप्रमाणे श्री. प्रकाश भंडारी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शनपर भाषण केले.

कार्यक्रमाच्या पुढील सत्रात संघटनेच्या सभासदांनी गायनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. विविध गीतांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रम अत्यंत रंगतदार आणि श्रवणीय झाला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात गायकांना उत्स्फूर्त दाद दिली. त्यामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. नितीन हमीने यांनी आभारप्रदर्शन केले. त्यांनी उपस्थित मान्यवर, सभासद तसेच कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यानंतर रुचकर भोजन आणि दुग्धपानाचा कार्यक्रम झाला. सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेत परस्परांशी संवाद साधला आणि स्नेहमेळाव्याचा आनंद द्विगुणित केला. या कार्यक्रमाचे संयोजन श्री. कमलाकर पाठक आणि श्रीमती तेजस्विता मेडसिंग यांनी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने केले. त्यांच्या नियोजनबद्ध आणि प्रभावी संयोजनामुळे कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. बाळकृष्ण दौलताबादकर, श्री. दत्तात्रय गोपवाड आणि श्री. भगवान कासारे यांनी विशेष परिश्रम घेतले. सभासदांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कोजागिरी पौर्णिमेचा हा सोहळा आनंददायी आणि आपुलकीच्या वातावरणात संपन्न झाला. अशा कार्यक्रमांमुळे सभासदांना एकत्र येण्याची, विचारांची देवाणघेवाण करण्याची आणि संघटनेतील एकोपा व बंधुभाव अधिक दृढ करण्याची संधी मिळते.

एकंदरीत, गीता भवन येथे आयोजित कोजागिरी पौर्णिमेचा सोहळा उत्साहात, आनंदात आणि अविस्मरणीय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमामुळे सभासदांमध्ये स्नेह, समाधान आणि संघटनेप्रती आपलेपणाची भावना अधिक दृढ झाली.

आरोग्य तपासणी शिबीर व ह्रदयाच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन

प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेने ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर व डॉ. श्रेयस रुणवाल यांचे ह्रदयाच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन

ज्योतिर्मय साहित्य

गुरुवार २९-१०-२०२६ रोजी गीता भवन येथे आयोजित केले होते. तपासणी शिबिरात १०० ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदविला. ईसीजी, बी पी, शुगर, एचबीए१सी (१) ई चाचन्या करण्यात आल्या. व्यासपीठावर डॉ. श्रेयस रूणवाल, डॉ. श्रद्धा रुणवाल व डॉ. सतिश रूणवाल सहित प्रभारी अध्यक्ष वंदना देशमुख, सचिव कमलाकर पाठक, प्रमोद सुरडकर उपस्थित होते. डॉक्टरांचा परिचय कमलाकर पाठक यांनी केला. प्रास्ताविक प्रभारी अध्यक्ष वंदना देशमुख यांनी केले. प्रमोद सुरडकर ह्यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. विश्वास काळे ह्यांनी पसायदान म्हणून सांगता केली.डॉ. श्रेयस रूणवाल, डॉ. श्रद्धा रुणवाल व डॉ. सतिश रूणवाल यांनी मार्गदर्शन केले.



डॉ श्रद्धा रुणवाल : ज्येष्ठांनी वयोमानाप्रमाणे बीपी, शुगर, कोलेस्टेरॉल, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी १२ ई चाचण्या नियमित करून घ्याव्या. व्हदयाचे आरोग्य तपासले पाहिजे यामध्ये इ सी जी करून हार्ट हार्ट फंक्शनिंग व्यवस्थित आहे का हे तपासून बघितलं पाहिजे. ट्रेड मिल टेस्ट निगेटिव्ह आल्यास डॉक्टर चा सल्ला घ्यावा. ब्लॉकेज ७०% पेक्षा जास्त असल्यास डॉ. चा सल्ला घेणे. अँजिओग्राफी आवश्यक आहे का हे पण बघितलं पाहिजे.

फळं खाल्ले पाहिजे. शुगर वाढली तर नियंत्रित कशी करता येईल हे बघितलं पाहिजे. रक्तात शुगर चे प्रमाण जास्त झाल्यास लकवा होऊ शकतो. किडनी वर विपरीत परिणाम होऊ शकतो.

दर ३ महिन्याला बीपी, शुगर चेक केली पाहिजे. व्यायाम, चालणं हे सगळ्यात उत्तम उपाय आहे. कोलेस्ट्रॉल उपाशी पोटी चेक केल पाहिजे. सिगारेट, तंबाखू सेवन केल्या मुळे तरुणपणी हे आजार होतात असं आढळून आलं आहे.

जर ७०% ते ९०% पर्यन्त ब्लॉकेज असेल तर उपचार करून रुग्ण बरा होतो.

२) डॉ श्रेयस रुणवाल ह्यांनी खालील मुद्दे मांडले.

बीपी १३० /९० नॉर्मल आहे. बीपी वाढलं तर मेंदूची शीर ताणली जाऊन लकवा येऊ शकतो.

शुगर साठी एच बी ए १सी हे ६ च्या आत पाहिजे. हे ३ महिन्याचं ऍव्हरेज शुगर टेस्टिंग आहे. भात व पोळी खाऊ नये असं त्यांनी सांगितलं.

हार्ट अटॅक आलेलं कळत नाही. लक्षणं जर लक्षात आले तर लगेच डॉ कडे तब्येत दाखवली पाहिजे.

दम जर सारखा लागत असेल, सारखा घाम येत असेल, श्वास घ्यायला त्रास होत असेल तर ही अटॅक ची लक्षणे असतात. अस डॉ श्रेयस रुणवाल म्हणाले.

आयुष्यमान भारत स्कीम मधील जवळ जवळ सर्व चेकिंग, उपचार मोफत होतात, स्कीम च्या बाहेरील टेस्टिंग सवलती मध्ये केले जाते.

३) डॉ सतीश रुणवाल ह्यांनी अँजिओग्राफी म्हणजे काय हे सांगितले. ब्लड ब्लॉकेज जर झाले तर अँजिओग्राफी करून ब्लॉक झालेला रक्त प्रवाह सुरळीत केला जातो. उपस्थित सर्वांनी डॉक्टरांचे मार्गदर्शन व सल्ला ऐकला, मनातील शंका विचारल्या. डॉक्टरांनी सर्व प्रश्नांची समाधान कारक उत्तरे दिली.



प्राचार्य प्रा. डॉ. गोविंद ढगे यांना 'आदर्श प्राचार्य' तर प्रा. अमोल अडकिणे 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्था यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. गोविंद ढगे सर यांना 'आदर्श प्राचार्य' पुरस्कार, तर प्रा. अमोल अडकिणे यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री ना. श्री. संजय शिरसाट, अश्विनी लाटकर, शिक्षण अधिकारी, माध्यमिक विभाग, छ. संभाजीनगर, संस्थेचे सचिव श्री. ई के जाधव साहेब, अध्यक्ष डॉ. जे के जाधव, मा. महापौर नंदकुमार घोडेले, श्री सह-सचिव अमन जाधव साहेब यांच्या शुभहस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील समर्पित कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठीचे योगदान आणि संस्थेच्या प्रगतीसाठी घेतलेला पुढाकार या कार्याची दखल घेऊन या दोन्ही मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

डॉ. गोविंद ढगे यांनी प्राचार्य म्हणून शैक्षणिक नेतृत्व, प्रशासकीय समन्वय आणि संस्थेच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव 'आदर्श प्राचार्य' पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात आला. डॉ. ढगे यांनी अध्यापन क्षेत्रात केलेले योगदान, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी घेतलेले परिश्रम आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी केलेले मार्गदर्शन यांचा सन्मान 'आदर्श प्राचार्य' पुरस्काराने करण्यात आला. या पुरस्कारांमुळे शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षक व प्राचार्यांना नवी प्रेरणा मिळणार असून, शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याची उमेद अधिक बळकट होणार आहे.

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा सन्मान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रेरणा, हे या पुरस्कार सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले. भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेच्या या उपक्रमाचे शैक्षणिक क्षेत्रातून स्वागत करण्यात येत असून, पुरस्कारप्राप्त डॉ. गोविंद ढगे यांच्या यशाचे संस्थेतील सर्व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्राध्यापक सदस्यांनी कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

क्रांतीची मुळाक्षरे:-सम्यक विचारधारेची मर्मग्राही कविता

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

आजच्या समकालीन सर्वहारा वंचित घटकांच्या लेकरांच्या हाती नवी मुळाक्षरे कवी देतो आहे.ज्यांच्या हातात कटोरे आहेत


त्यांच्या हाती लेखणी आली पाहिजे. ''अ-अण्णाभाऊंचा,आ-आंबेडकरांचा,ब-बिरसांचा../आणि

बघ/त्यांचे चिमुकले हात/कसे गिरवतात./क-क्रांतीचा..(पृ.१८)अशी अत्यंत निस्सीम ध्येयाची ही कविता आहे.

ज्ञानप्रज्ञेच्या विचार श्रंखलेशी ही कविता नवा आशय देऊन जाते. प्रा.मधुकर जाधव प्रस्तावनेत लिहितात '' आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवात क्रांतीचीमुळाक्षरे

नव्या अर्थाने वाचण्याची गरज आहे.या कविता केवळ विद्रोह व्यक्त करत नाही.त्या विवेकही जागवतात.

आत्मपरिक्षण करायला भाग पाडतात.आणि समतेच्या दिशेने मार्गक्रमण करण्याची उर्मी देतात''(पृ.८)या कवितेने समकालीन वास्तवाचे सम्यक दृष्टीने समर्पक समृद्ध भान दिले आहे.आज सर्वव्यापी जी




अमानूषता दिसते आहे.ती कवीच्या चिंतन धार होऊन व्यक्त होते.जसे'' हातात परिवर्तनाची पताका घेऊन/मी निघालो आहे/ एक जात, धर्म,वर्ण,पंथ, संप्रदाय,..विहीन/प्रबुद्ध युगनिर्मितीचे स्वप्न साकार करण्यासाठी../जे येणार असतील त्यांनी यावं/

समतेचे पथिक बनून.../मी मात्र चालतच राहणार आहे/

माझा निर्धार अढळ आहे!(पृ.३३)



अशी ही सम्यक संबुध्दांच्या मध्यम विचारधारेची निर्धाराची ध्येयासक्ती



घेऊन क्रांतीची मुळाक्षरे धिरोदत्तपणे गोंदवते आहे.'' सामाजिक नि सांस्कृतिक पातळीवरची विषमता, धर्मांधता, अन्याय अशा विघातक बाबी कशा घातक आहेत.याचे निर्मूलन करण्याचे पर्याय काय आहेत.याचे सुक्ष्म चित्रण चित्राकिंत या कवितेने केले आहे. माणूसकेंद्रीयता ही या कवितेची अंतर्भूमी आहे''

(पाठराखण) ख्यातनाम कवी समीक्षक महेंद्र ताजणे यांची चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचक समीक्षक पाठराखण हे या कवितेचा मर्मग्राही अनुबंध मानला पाहिजे.क्रांतीची मुळाक्षरे प्रशांतकुमार यांच्या कवितेचे सूर्यकुळांची अक्षरलेणी अशी दिशांकित झाली आहे.हे भाष्य अतिशय समर्पक सृजनशीलतेचे आहे.म्हणून ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाने माणुसकीचा गहिवर मांडते.

पुस्तक परिचय:-क्रांतीची मुळाक्षरे (कवितासंग्रह)

कवी :-प्रशांतकुमार डोंगरदिवे

प्रकाशक:-समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर

मुखपृष्ठ:-प्रशांतकुमार, चिखली


पृष्ठ ८० किंमत १५०/रूपये

पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना



पुढे.....

त्यामुळे, त्यांचा इतर शहरांशी संपर्क होऊ शकत नाही. म्हणून त्या भागातील लोकांना बोटींद्वारे, हेलिकॉप्टरद्वारे अन्यत्र सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागते. ही झाली पावसाळ्यातील परिस्थिती! परंतु, चारंच महिन्यांनंतर धरणांच्या पाणीपातळीचा आढावा घेतला तर धरणातील पाणीसाठा फक्त तीस ते पस्तीस टक्के असल्याचे आढळून येते. ही फार विसंगतीची बाब आहे. असे का होते! पावसाळ्यात भरुन वाहणारी धरणे एकदम पंचवीस तीस ते टक्क्यांपर्यंतच्या खालच्या पाणीपातळीपर्यंत कशी येतात. जागतिक पर्यावरण तज्ज्ञांच्या संशोधनाअंती असे दिसून आले आहे की, विविध धरणांमध्ये जेव्हा पावसाचे पाणी साठत जाते तेव्हा त्यात गाळही साठत जातो. त्यामुळे, दरवर्षी जो गाळ धरणांमध्ये साठत जातो. तो धरणांतील गाळ महानगरपालिकेच्या संबंधित यंत्रणांमार्फत काढला जात नाही. वर्षानुवर्षे गाळ न काढण्याचा हाच निष्काळजीपणा दरवर्षी महानगरपालिकांकडून होत जातो. त्यामुळे, धरणांमध्ये गाळाचे प्रमाण वरचेवर वाढत जाते. त्यामुळे, शहरातील लोकांना दरमहा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करीत असताना जानेवारी, फेब्रुवारी महिन्यातंच पाण्याची अत्यंत टंचाई निर्माण होते. चालू सन २०२६ यावर्षी तर गेल्या दोन तीन वर्षांच्या तुलनेत पाण्याची अतिभयंकर टंचाई जाणवत आहे. ऑक्टोबर,२६ मध्येच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये पाण्याअभावी तीव्र असा दुष्काळ पडला आहे.ही अशी परिस्थिती वारंवार का उद्भवते यांचा विचार व अभ्यास महाराष्ट्रातील सर्व जनतेने व राज्यशासनाने करणे व त्याबाबत ठोस उपाययोजना करुन आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करुन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनानेही तीनशे, साडेतीनशे तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. एकविसाव्या शतकात आत्तापर्यंत अशी दुष्काळाची परिस्थिती कधीही उद्भवलेली नव्हती. ती या तिसऱ्या दशकात निर्माण झाली आहे. विसाव्या शतकाच्या आठव्या दशकात १९७२ साली असाच फार मोठ्या प्रमाणात संपुर्ण महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ पडला होता. पावसाच्या पाण्याची अत्यंत टंचाईची अशी परिस्थिती त्यावेळेस महाराष्ट्रात नव्हती. महाराष्ट्र सरकारने तेव्हा अमेरिकेतून मोठया प्रमाणात गहू मागविल्या होता. तसेच, गरीब लोकांना सुकडीच्या धान्याचे मोफत वाटप केले जात असे. (क्रमश:)



मुलांसाठी बोधकथा

आर.पी. दुसे, 94 22202747

राजा काहीं मरत नाही ?

पुढे.....

तेव्हा ती व्यक्ती म्हणाली तीच तर खरी काळजी माझे मनात घर करून आहे.

पुढे तो बोलू लागला "मला असे कळाले आहे की राजा मेल्या नंतर त्याला चंदनाच्या लाकडात जाळतात आणि ऐन वेळी चंदन मिळण्यास कठीण होते. त्रास होतो धावाधाव होते म्हणून मी अल्प दरात चंदनाचे लाकूड खरेदी करून ठेवले त्यासाठी कर्ज तेव्हा घेतले आहे .ह्या गोष्टीला चार वर्ष होवून गेले त्याचे व्याजही भरपूर झाले आहे . त्यामुळे मी काळजीत आहे मानसिक तान तनावा मध्ये वावरत आहे . राजा मरत नाही आणि मला चंदन पुरवता येत नाही आणि माझे कर्ज फिटत नाही व्याजाचा डोंगर वाढतच चालला आहे त्याच्या खाली मीच आता दबून मरण्याची शक्यता जास्त वाटते". त्यावर प्रधानजी म्हणाले "तू मला एक गोष्ट सांग तुला खरच राजा मरून जावा असे वाटते काय? किंवा तुला कर्ज मुक्त व्हावे वाटते. तुझी काय इच्छा आहे" त्यावर तो म्हणाला "राजा १०० वर्षे जगला तरी माझी काय हरकत असणार ? किंवा मला त्यात आनंदच आहे कारण असा चांगला राजा पुन्हा होणार नाही पण मी कर्ज मुक्त व्हावे एव्हडी माझी खरी इच्छा आहे."

तेव्हा प्रधानजी ने लगेच त्याची सर्व चंदनाची लाकडे खरेदी करून त्याला कर्जमुक्त केले. त्याला कर्जमुक्त केले इतकेच नाही तर त्याला व्यवसाय करण्या साठी आणखी भरपूर बिदागी दिली.

त्यामुळे ती व्यक्ती आनंदी झाली. पुन्हा जेव्हा राजाची मिरवणूक निघाली तेव्हा तेच ठिकाण, तोच माणूस, तोच राजा पण ह्या वेळी राजाच्या मनात मात्र त्या व्यक्ती विषयी आपुलकीची भावना निर्माण होत होती. तिरस्कार पार निघून गेला होता कारण त्या माणसाच्या मनातील राजाच्या मृत्यूचे चिंतन संपून राजा बद्दल सकारात्मक विचार निर्माण झाले होते. तेव्हा राजा बुचकळ्यात पडला. असे कसे झाले?

तेव्हा प्रधानजी ने त्यांना सांगितले की महाराज आपण जसा दुसऱ्या बद्दल विचार करता तसाच दुसराही आपल्या बद्दल विचार करीत असतो. कारणे वेगवेगळी असू शकतात. जगात कोठलीही गोष्ट कारणा शिवाय घडत नसते. पण ही कारणे सुप्त असतात आणि मानसशास्त्रीय विचाराने ह्या सत्याची सोडवणूक करावी लागते तेव्हाच दोघानाही सुख, समाधान, आनंद पदरी पाडून घेण्याचे सौख्य मिळत असते.

कुटुंबप्रमुख हवा आहे ! क्रमशः भाग १८ : सत्यनारायणाची पूजा

ज्योतिर्मय साहित्य

''मामा, मी कृष्णकांतशी बोलले. त्यांनी सत्यनारायणाच्या पूजेसाठी लॉस एंजेलिस आणि दक्षिण कॅलिफोर्निया परिसरात मराठीत पूजा सांगणारे पुरोहित श्री. शिरीष अयाचित यांच्याशी संपर्क साधला. ते लॉस एंजेलिसजवळील लाँग बीच परिसरात राहतात. दक्षिण कॅलिफोर्नियामध्ये ते मराठी परंपरेनुसार सत्यनारायणाची पूजा, गृहप्रवेश आणि इतर धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने करून देतात. मात्र, दसऱ्याच्या दिवशी त्यांना वेळ नाही. त्या दिवशी त्यांनी आधीच दुसरीकडे पूजेचे वेळापत्रक ठरवले आहे. ते म्हणाले की साडेतीन मुहूर्तांपैकी कोणत्याही दिवशी आपण सत्यनारायणाची पूजा करू शकतो,'' पमेलाने मामांना सांगितले.

''अगं, चालेल की! दिवाळीच्या पाडव्यालाही आपण सत्यनारायणाची पूजा करू शकतो. तो साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे,'' आजोबा म्हणाले.

''मामा, हे साडेतीन मुहूर्त म्हणजे काय?'' पमेलाने विचारले.

''सांगतो. मुलं कुठे आहेत?'' आजोबांनी विचारले.

''आत आहेत, मामा.''

''मग त्यांनाही बोलाव. म्हणजे त्यांनाही साडेतीन मुहूर्त म्हणजे काय, हे समजेल.''

''श्रीराम आणि श्रुतकीर्ती, इकडे या बरं!'' पमेलाने मुलांना आवाज दिला.

दोन्ही मुले धावतच आली.

''आई, का बोलावलेस आम्हाला?'' श्रीरामने विचारले.

''अरे, आजोबा तुम्हाला काही महत्त्वाचे सांगणार आहेत. त्यांनीच तुम्हाला बोलवायला सांगितले,'' पमेला म्हणाली.

''सांगा ना आजोबा!'' दोन्ही मुले म्हणाली.

''आपल्या परंपरेनुसार शुभ, पवित्र आणि मंगल कार्य सुरू करण्यासाठी अनुकूल वेळ निवडली जाते. त्या वेळेला शुभमुहूर्त म्हणतात,'' आजोबा म्हणाले.

''पण आजोबा, मुहूर्त म्हणजे नेमके काय?'' श्रुतकीर्तीने विचारले.

''छान प्रश्न विचारलास, बेटा! मुहूर्त या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे कालमापनाचे एकक आणि दुसरा म्हणजे एखादे शुभ कार्य सुरू करण्यासाठी निवडलेली अनुकूल वेळ.

''भारतीय कालगणनेनुसार एका अहोरात्राचे म्हणजेच चोवीस तासांचे तीस मुहूर्त मानले जातात. एका मुहूर्ताचा कालावधी अठ्ठेचाळीस मिनिटांचा असतो. त्यांपैकी पंधरा मुहूर्त दिवसाचे आणि पंधरा मुहूर्त रात्रीचे मानले जातात.



''शुभकार्याची वेळ ठरवताना भारतीय ज्योतिषशास्त्रात तिथी, वार, नक्षत्र, योग आणि ग्रहस्थिती यांचा विचार केला जातो. त्यानुसार विवाह, गृहप्रवेश, वास्तुशांती, भूमिपूजन आणि उपनयन यांसारख्या कार्यांसाठी शुभमुहूर्त निश्चित केले जातात. ''म्हणजेच मुहूर्त हा केवळ घड्याळातील वेळ नसून एखाद्या कार्याच्या प्रारंभासाठी निवडलेला अनुकूल कालखंड, अशी भारतीय परंपरेतील धारणा आहे. मात्र, कोणतेही कार्य योग्य संकल्पाने, योग्य प्रयत्नांनी आणि योग्य पद्धतीने करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.'' ''मामा, हे तर छान समजले. पण मुळात ते साडेतीन मुहूर्त कोणते आहेत?'' पमेलाने विचारले.

''ते आपण उद्या पाहू. एकाच वेळी सगळे ऐकल्याने लक्षात राहणार नाही,'' आजोबा म्हणाले.

क्रमशः भाग १९ : साडेतीन मुहूर्त आणि सत्यनारायण

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559